

श्री. एकनाथ शिंदे
मा. मुख्यमंत्री



श्री. देवेंद्र फडणवीस
मा. उपमुख्यमंत्री

सत्यमेव जयते



श्री. चंद्रकांत पाटील
मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण

महाराष्ट्र शासन

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग

### उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेअंतर्गत सन २०२३-२४ करिता विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील ज्या गुणवंत विद्यार्थ्यांनी पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदवी व पीएचडी अभ्यासक्रमासाठी, THE (Times Higher Education) / किंवा QS (Quacquarelli Symonds) World Ranking २०० च्या आंत असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतला असेल, अशा विद्यार्थ्यांकरीता शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दि.०४.१०.२०१८, क्रमांक संकीर्ण-२०२०/प्र.क्र.११६/ तांशि-४ दिनांक ०६ सप्टेंबर, २०२१, शासन शुध्दीपत्रक क्र. संकीर्ण-२०१९/ प्र.क्र.२७४(भाग-२)/ तांशि-४ दिनांक २२ मार्च, २०२२ व शासन पत्र क्रमांक पशियो-२०२३ /प्र.क्र.५०/तांशि-४, दि.२९ मे, २०२३ नुसार सदर शिष्यवृत्ती योजना राबविण्यांत येत आहे.

या शिष्यवृत्तीसाठी खालीलप्रमाणे शाखा / अभ्यासक्रम निहाय जागा उपलब्ध असतील :-

| अ.क्र. | शाखा / अभ्यासक्रम | पदव्युत्तर पदविका व पदव्युत्तर पदवी | डॉक्टरेट | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | कला | ०१ | ०१ | ०२ |
| २. | वाणिज्य | ०१ | ०१ | ०२ |
| ३. | विज्ञान | ०१ | ०१ | ०२ |
| ४. | व्यवस्थापन | ०१ | ०१ | ०२ |
| ५. | विधी अभ्यासक्रम | ०१ | ०१ | ०२ |
| ६. | अभियांत्रिकी/वास्तुकला शास्त्र | ०४ | ०४ | ०८ |
| ७. | औषधनिर्माणशास्त्र | ०१ | ०१ | ०२ |
| | **एकूण** | १० | १० | २० |

अटी :

- उमेदवार व उमेदवाराचे आई / वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असणे आवश्यक आहे.
- शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये प्रवेश घेतलेल्या व प्रवेश घेण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या परदेशातील शैक्षणिक संस्थेचे, अद्ययावत (सन २०२३ मधील) THE (Times Higher Education) / किंवा QS (Quacquarelli Symonds) World Ranking २०० च्या आंत असणे बंधनकारक आहे.
- उमेदवाराच्या पालकांचे/कुटुबांचे व उमेदवार नोकरी करीत असल्यास त्याचे स्वत:चे उत्पन्न धरुन सर्व मार्गांनी मिळणारे मागील आर्थिक वर्षातील (२०२२-२३ मधील) **एकत्रित कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु. ८ लाखापेक्षा जास्त नसावे.**
- इच्छुक विद्यार्थ्यांनी **https://foreignscholarship2023.dtemaharashtra.gov.in** या संकेतस्थळावर online पद्धतीने अर्ज भरावा व online भरलेल्या अर्जाची प्रत, मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह पडताळणीसाठी संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालयात वेळापत्रकानुसार सादर करावीत.
- या योजनेच्या सविस्तर अटी व शर्ती, पात्रता, वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, मिळणारे लाभ, शिष्यवृत्तीच्या लाभासाठी निवड कार्यपध्दती इत्यादी माहिती करिता **https://dte.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर आवश्यक ते शासन निर्णय उपलब्ध करुन देण्यांत आलेले आहेत. तसेच सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये व सहसंचालक, उच्च शिक्षण विभागीय कार्यालये यांची यादीही संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहे.

महाराष्ट्र शासन

# उच्च व तंत्र शिक्षण विभाग

## तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४१९/४६४/४९३

ई-मेल–desk17@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

क्रमांक : १७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२३/१५४ दिनांक : १२ जून, २०२३

"जाहिरात"

**उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेअंतर्गत सन २०२३-२४ करिता विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.**

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत महाराष्ट्र राज्यातील **खुल्या प्रवर्गातील** ज्या गुणवंत विद्यार्थ्यांनी सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदवी व पीएचडी अभ्यासक्रमासाठी, THE (Times Higher Education) / किंवा QS (Quacquarelli Symonds) World Ranking २०० च्या आंत असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतला असेल, अशा विद्यार्थ्यांकरीता शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दि.०४.१०.२०१८, क्रमांक संकीर्ण-२०२०/प्र.क्र.११६/ तांशि-४ दिनांक ०६ सप्टेंबर, २०२१ व शासन शुध्दीपत्रक क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.२७४(भाग-२)/तांशि-४ दिनांक २२ मार्च, २०२२ व शासन पत्र क्रमांक पशियो-२०२३ /प्र.क्र.५०/तांशि-४, दि. २९ मे, २०२३ नुसार सदर शिष्यवृत्ती योजना राबविण्यांत येत आहे.

**सदर योजनेंतर्गत पात्र उमेदवारांकडून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी Online पध्दतीने अर्ज मागविण्यांत येत आहेत.**

या शिष्यवृत्तीसाठी खालीलप्रमाणे शाखा / अभ्यासक्रम निहाय जागा उपलब्ध असतील :-

| अ.क्र. | शाखा / अभ्यासक्रम | पदव्युत्तर पदविका व पदव्युत्तर पदवी | डॉक्टरेट | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | कला | ०१ | ०१ | ०२ |
| २. | वाणिज्य | ०१ | ०१ | ०२ |
| ३. | विज्ञान | ०१ | ०१ | ०२ |
| ४. | व्यवस्थापन | ०१ | ०१ | ०२ |
| ५. | विधी अभ्यासक्रम | ०१ | ०१ | ०२ |
| ६. | अभियांत्रिकी/वास्तुकला शास्त्र | ०४ | ०४ | ०८ |
| ७. | औषधनिर्माणशास्त्र | ०१ | ०१ | ०२ |
| | **एकूण** | १० | १० | २० |

**सदर शिष्यवृत्तीसाठी पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे आहेत :**

- उमेदवार व उमेदवाराचे आई / वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असावेत.
- शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये प्रवेश घेतलेल्या व प्रवेश घेण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या परदेशातील शैक्षणिक संस्थेचे अद्ययावत (सन २०२३ मधील) THE (Times Higher Education) / किंवा QS (Quacquarelli Symonds) World Ranking २०० च्या आंत असणे बंधनकारक आहे.

- उमेदवाराच्या पालकांचे/कुटुंबांचे व उमेदवार नोकरी करीत असल्यास त्याचे स्वत:चे उत्पन्न धरुन सर्व मार्गांनी मिळणारे मागील आर्थिक वर्षातील (२०२२-२३ मधील) **एकत्रित कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु. ८ लाखापेक्षा जास्त नसावे.**
- या योजनेच्या सविस्तर अटी व शर्ती, पात्रता, वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, मिळणारे लाभ, शिष्यवृत्तीच्या लाभासाठी निवड कार्यपध्दती इत्यादी माहिती करिता तंत्र शिक्षण संचालनालयाच्या **https://foreignscholarship2023.dtemaharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यांत आलेला शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१८ व शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०२०/प्रक्र.११६/तांशि-४, दिनांक ६ सप्टेंबर, २०२१ चा शासन निर्णय तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दिनांक ३० ऑक्टोबर, २०१८ व दिनांक ११ फेब्रुवारी, २०१९ ची शासन शुध्दीपत्रके पहावीत व त्याअनुषंगाने अर्जांची छाननी करण्यांत येईल.

इच्छुक उमेदवारांनी **https://foreignscholarship2023.dtemaharashtra.gov.in** या संकेतस्थळावर online पद्धतीने अर्ज भरावा व online भरलेल्या अर्जाची प्रत, मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह पडताळणीसाठी संबंधित विभागीय कार्यालयात खालील वेळापत्रकानुसार सादर करावीत.

| क्र. | कार्यक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | **संकेतस्थळावर** online पद्धतीने अर्ज भरणे व आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रे अर्जासोबत अपलोड करणे | १३ जून, २०२३ ते<br>१२ जुलै, २०२३ |
| २ | • ज्या उमेदवारांनी कला, वाणिज्य, विज्ञान व विधी शाखेंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमासाठी अर्ज केला आहे त्यांनी उमेदवार वास्तव्यास असलेल्या जिल्ह्याशी संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालय, उच्च शिक्षण येथे<br>व<br>• ज्या उमेदवारांनी व्यवस्थापन, अभियांत्रिकी / वास्तुकलाशास्त्र व औषधनिर्माणशास्त्र शाखेंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमासाठी अर्ज केला आहे त्यांनी उमेदवार वास्तव्यास असलेल्या जिल्ह्याशी संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालय, तंत्र शिक्षण येथे<br>वर नमूद केल्याप्रमाणे online भरलेल्या अर्जाची प्रत, मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह पडताळणीसाठी सादर करावीत. | १४ जून, २०२३ ते<br>१३ जुलै, २०२३<br>(सायंकाळी ५.०० वा. पर्यंत) |

विभागीय कार्यालये, उच्च शिक्षण व विभागीय कार्यालये, तंत्र शिक्षण यांची यादी वरील संकेतस्थळावरील माहिती पुस्तिकेमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

Online **अर्जाशिवाय इतर कोणत्याही पध्दतीने केलेला अर्ज विचारात घेण्यांत येणार नाही.** इच्छुक उमेदवारांनी निर्धारित कालावधीत वरील प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

स्वा /-
**(डॉ. विनोद मोहितकर)**
प्र.संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई